# माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत माहिती मिळविण्याची प्रक्रिया

केंद्रीय / राज्य सहाय्यक जन माहिती अधिकारी
अर्ज व अपिल अर्ज स्विकारणे
(अर्ज प्राप्तीपासुन ५ दिवस)

केंद्रीय व राज्य जन माहिती अधिकारी
अर्जावर निर्णय व माहिती मिळण्याचे ठिकाण
(अर्ज प्राप्तीपासुन ३० दिवस)

प्रथम अपिलीय अधिकारी
पहिले अपिल/तक्रार निवारण
(अपिल प्राप्तीपासुन ४५ दिवस)

केंद्रीय / राज्य माहिती आयुक्तालय
दुसरे अपिल / तक्रार निवारण
अपिल प्राप्तीपासुन ९० दिवस

**माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेचा आलेख**

# माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेचा आलेख

## ❖ सहाय्यक जन माहिती अधिकारी

**अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांचे आत**

- अर्ज तपासून विशिष्ट नोंदवहीत नोंद घेईल.
- त्यानंतर अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे सुपुर्द करेल.

---

## ❖ जन माहिती अधिकारी

**अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत**

- अर्ज तपासून संबंधीत कार्यासनास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळवेल.
- त्यानंतर माहिती संबंधीत नसल्यास योग्य त्या संबंधीत प्राधिकरणाकडे मुळ अर्ज हस्तांतरीत करेलव तसे अर्जदारास सुध्दा कळवेल.
- माहितीशी संबंधीत आवश्यक शुल्क व शुल्क भरण्याच्या तारखेबाबत अर्जदारास लेखी कळवेल.
- अर्जदाराने (दारिद्य रेखेखाली नसलेल्या) माहितीचे योग्य शुल्क भरणा केल्यास माहितीच्या प्रती अर्जदाराने विनंती केल्यानुसार प्रत्यक्ष देईल किंवा पोष्टाने पाठवेल. माहिती उपलब्ध नसल्यास तसेही योग्य कारणासह अर्जदारास कळवेल. तसेच अर्जदारास प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव, पदनाम, पत्ता, दुरध्वीनी क्रमांक व अपिल करण्याचा कालावधी सुध्दा कळवेल.

---

## ❖ अर्जदार खालील प्रकारे शुल्क भरणा करुन शकेल

- मनिऑर्डरव्दारे / कोर्ट फी स्टॅम्पव्दारे.
- संबंधीत कार्यालयात रोखीने
- शासकीय कोषागारात चालानव्दारे

---

## ❖ जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती नाकारण्यात आली किंवा माहिती मिळण्यास उशिर झाला किंवा चुकीची अथवा त्रुटीयुक्त माहिती देण्यात आल्यास.

- जन माहिती अधिकाऱ्याचे निर्णय प्राप्तीपासुन ३० दिवसात प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे पहिले अपिल करता येईल.
- प्रथम अपिलचा निर्णय प्राप्तीनंतर ९० दिवसात राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल करता येईल.